# जीवन में सफलता के लिए कर्तव्य न भूलें : प्राचार्य पवार



तहसील संवाददाता | मालेगांव

भावी जीवन उज्वल व सफल बनाने के लिए विद्यार्थियों को अपना कर्तव्य व जबाबदारी याद रखने का आव्हान प्राचार्य मुरलीधर पवार ने विद्यार्थियों से किया। वे स्थानीय रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय में बीए तृतीय व बी.काम तृतीय वर्ष के विद्यार्थियों के बिदाई समारोह की अध्यक्षता करते हुए सम्बोधित कर रहे थे । अपने सम्बोधन में प्रचार्य पवार ने आगे कहा कि जीवन में सफल होने के लिए ज़िद, लगन, मेहनत, प्रयास व अभ्यासुवृत्ति आवश्यक है । व्यक्ति स्वतंत्रता के साथही प्रत्येक विद्यार्थी को कर्तव्यों का कडा पालन करना, व्यक्तिमत्व विकास के लिए आवश्यक है । जीवन में अच्छे अंको से उत्तीर्ण होने के लिए अभ्यास करना जरुरी है । इस कारण सभी विद्यार्थी मन लगाकर पढ़ाई करते हुए अपना जीवन सफल व उज्वल बनाए । उन्होंने बिदाई समारोह में विद्यार्थियों को भविष्य के लिए शुभकामनाएं भी दी । समारोह का संचालन पल्लवी गावंडे ने किया तो आभारमाना शुभांगी कांबले ने । कार्यक्रम में प्रा. सुनील देव्हडे, प्रा. व्ही.व्ही. आरु, प्रा.डा. लता जावले, प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा.डा. संजय ताजने, प्रा. भिमराव जांभरुणकर, प्रा. दीपक जमधाडे, प्रा. वाय.एस. निकस, गणेश खड़से के साथही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी बड़ी तादाद में उपस्थित थे।

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim

# आज झनक महाविद्यालयात राष्ट्रीय उच्च शिक्षण धोरण निश्चिती बाबत चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा**
**मालेगाव, २५ ऑक्टोबर**

नवीन राष्ट्रीय धोरण निश्चित करण्याच्या अनुषंगाने उच्च शिक्षणाबाबत उद्या २६ ऑक्टोबर रोजी येथील झनक महाविद्यालयात चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चा सत्रात शिक्षण विद्यार्थी सह उच्च व तंत्र शिक्षण विषयात रूची बाळगणारे विविध घटकाचा समावेश राहणार असल्याची माहिती प्रा. एम.आर. पवार यांनी दिली आहे.

येथील रामराव झनक महाविद्यालय येथे २६ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्र कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुरेश शिंदे हे राहणार असून, प्रमुख मार्गदर्शक आ. अमित झनक हे उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी तहसीलदार सोनाली मेटकरी, प्रा. मुरलीधर पवार, प्रा. डॉ. डी. जी. भंडागे आदीची उपस्थिती राहणार आहे. संचालक उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अमरावती विभाग यांच्या पत्रानुसार, नविन राष्ट्रीय उच्च शिक्षण धोरण तालुका समिती मालेगावच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात राष्ट्रीय उच्च शिक्षण धोरण निश्चिती बाबत चर्चा करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने गुणवत्तेसाठी शासनाच्या सुधारणा संस्थाचा दर्जा आणि अधिस्विकृती विनिमयनाच्या गुणवत्तेतील सुधारणा केंद्रीय संस्थेची पावले मांडणी भूमिका राज्य लोक विद्यापीठ सुधारणा यासह इतर विविध २० विषयावर चर्चा करण्यात येणार आहे.

चर्चासत्रात उच्च शिक्षणाबाबत विद्यार्थी शिक्षण उच्च शिक्षणाशी सबंधीत शैक्षणिक संस्था, पालक, माजी विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, माजी लोकप्रतिनिधी शैक्षणिक सेवाशी संबंधित स्थानिक समितीचे अध्यक्ष सदस्य सामाजिक राजकीय शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा औद्योगिक इत्यादी क्षेत्रातील जाणकार व उच्च शिक्षण व तंत्र विषयात रूची बाळगणारे स्थानिक इत्यादी घटकांचा समावेश राहणार आहे. तरी या चर्चासत्र कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य एम. आर. पवार यांनी केले आहे.

दै- हिंदु॰ तरुण भारत
दि. 26/10/15

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College,Malegaon Dist.Washim

देशोन्नती 14/1/15

# युवक हा देशाचा आधारस्तंभ आहे - पवार

*तालुका प्रतिनिधी* / १३ जानेवारी

**मालेगाव :** देशाचे भवितव्य युवा पिढीवर अवलंबुन असल्याचे सांगताना प्राचार्य एम. आर. पवार ह्यांनी युवकांनी सुशिक्षीत सुसंस्कारीत व जागृत असावे कारण युवक हा देशाचा आधारस्तंभ असल्याचे ही त्यांनी सांगितले ते आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने आज १२ जानेवारीला राष्ट्रीय युवादिन तथा राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्य कार्यक्रम घेण्यात आला. रामराव झनक महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एम. आर. पवार हे होते. या कार्यक्रमाला रा. से. योजना अधिकारी प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. सुनिल देव्हढे ह्यांची उपस्थिती होती. सुरूवातीस राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गायकवाड ह्यांनी केले. प्रास्ताविकातुन त्यांनी कार्यक्रमा बाबत माहिती दिली यावेळी कु. कामीनी तुर्के, दिपाली उगले, कु. भाग्यश्री गवळी, कु. कोरडे, गणेश शिंदे, गणेश चव्हाण, भाऊराव देवळे ह्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एम. आर. पवार ह्यांनी आपल्या भाषनातुन राष्ट्रीय युवादिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्य हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. त्यामुळे चांगला उपक्रम आहे असे सांगताना भारताचे भवितव्य हे आता युवा पिढीवर अवलंबुन आहे. त्यामुळे आजच्या युवकाने शिक्षणाबरोबर संस्कारीत व्हावे जागृत राहावे कारण सक्षम भारताचा आधारस्तंभ युवक असल्याचे ही पवार ह्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना देशात ५७ टक्के युवक असुन त्यांनी त्याची जाणीव ठेवली. तर त्यांच्यात जागृती होईल जागृतीमुळे देशाचा विकास होईल तसेच युवकांनी कोणत्याही संकटाला तोंड देण्याची क्षमता ठेवावी तेंव्हाच युवक हे जिवनात यशस्वी होईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन कु. देशमुख हिने तर आभार प्रदर्शन कु. उगले हिंने केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थीनीची उपस्थिती होती. अतिशय उत्साहात हा कार्यक्रम घेण्यात आला.



PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College,Malegaon Dist.Washim

दै. देशोन्नती 28/10/15



# शैक्षणिक धोरण निश्चितीसाठी सर्व घटकांचा समावेश आवश्यक - आ. झनक

*तालुका प्रतिनिधी* /२७ ऑक्टोबर

**मालेगाव** : नविन राष्ट्रीय उच्च शैक्षणिक धोरण निश्चितीसाठी सर्व घटकांचा समावेश असणे ही काळाची गरज असल्याचे विचार आमदार अमित झनक हयांनी व्यक्त केले. ते मालेगाव येथे आयोजीत कार्यक्रमात बोलत होते. हया वेळी त्यांनी या धोरणामुळे समाजात शिक्षणाबाबत जागृती होणार आहे. असे सांगितले.

रामराव झनक कला व वाणीज्य महाविद्यालय येथे शासनाच्या धोरणानुसार नविन राष्ट्रीय उच्च्य शैक्षणिक धोरण बाबत कार्यकम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अमित झनक हे होते. तर कार्यक्रमाला रा.गो. शिक्षणसंस्थेच अध्यक्ष सुरेश शिंदे, प्राचार्य मुरलीधर पवार ,प्राचार्य डॉ डी.जी. भंडागे, यांची प्रमुख उपस्थिती होती उपस्थीत मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी पालक माजी विद्यार्थी लोकप्रतिनिधी शैक्षणिक सेवांसी संबधीत स्थानिक समितीचे अध्यक्ष सदस्य समाजातील राजकीय शैक्षणिक सांस्कृतीक क्रिडा उघोग इत्यादी श्रेत्रातील जाणकार मंडळची आर्वृजुन उपस्थीती होती.



कार्यक्रमात बोलतांना आमदार अमित झनक हयांनी नविन राष्ट्रीय उच्च शैक्षणिक धोरण निश्चीतीसाठी सर्व घटकांचा समावेश असणे ही काळाची गरज आहे. कारण सर्व घटकांच्या समावेशी मुळेच उच्च शैक्षणिक धोरणात सुधारण करणे शक्य आहे. असे सांगितले. तर यावेळी प्राचार्य एम आर. पवारय यांनी उच्च शैक्षणिक धोरण निश्चिती साठी आठ घटकांचा समावेश केल्यामुळे समाजात जागृती होऊन ही बाब अतिशय चांगली असल्याचे सांगितले. तर प्रा. भिमराव जांभरुकर हयांनी शैक्षणिक धोरण निश्चितीसाठी पाच मुद्यावर सवस्तिर प्रकाश टाकला व सांगोपांग चर्चा केली. या कार्यक्रमात उच्च शिक्षणातील कौशल्य विकासनाची एकात्मतिकता प्रादेशिक्षक विषमता उदेशाची आणि सामाजीक त्रुटी यांची पुनबांधणी उच्च शिक्षणाची समाजाशी जोड बांधणी हया मुद्यावर सविस्तर चर्चा करण्यता यऊन उपस्थीत घटकांचा प्रक्रिया प्रत्याभिसरण घेण्यात आले या कार्यक्रमाला उत्स्फेत प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे संचालन वआभार प्रदर्शन प्रा भिमराव जांभरुणकर, हयांनी केले. कार्यक्रमाला प्रा. सुनिल देव्हढे ,प्रा. भरत आव्हाळे, प्रा. डॉ. खाडे, प्रा. डॉ लांडे मॅड, जानकीराम पाटील, प्रा. सदानंद बानचरे, प्रा. भिमराव जांभरुणकर, हयांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ.लता जावळे, प्रा. ताजणे, प्रा. जमधाडे, प्रा. राठोड, प्रा निकस, प्रा. प्रा. सचिन रोकडे, प्रा. रोकडे, प्रा. गुरादे, प्रा. शेडे, प्रा. गायकवाड, यांच्यासह सर्व प्राध्यापक मंडळी ने सहकार्य केले तर कार्यक्रमाला विद्यार्थ्याची मोठया संख्येने उपस्थितीती होती.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College,Malegaon Dist.Washim

दि. 8-1-2015

# देशोन्नती

## संकटामध्ये संधी शोधणे म्हणजे व्यक्तीमत्व विकास - प्रा. आव्हाळे



**च्वार्ताहर** / ७ जानेवारी

**अमाणी :** व्यक्तीमत्वाचे अनेक पैलु असुन एन.एस.एस. च्या शिबीराव्दारे त्याला मुर्त स्वरुप प्राप्त होते. संकटात संधी शोधून तीचे सोने करणे म्हणजे व्यक्तीमत्व विकास असल्याचे प्रा. भरत आव्हाळे यांनी केले.ते दत्तकग्राम अमाणी येथील रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगांवच्या रासेयो शिबीराच्या बौध्दीक सत्रात "रासेयोमधुन व्यक्तीमत्व विकास" या विषयावर मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की. नियमित अभ्यासासोबत नियमित व्यायाम,आयाम, श्रमदान, चारित्य संपन्नता, सेवाभावीवृत्त, प्रयत्नवाद, सहकार्याची भावना, स्वावलंबन, चिकित्सक व चोखंदळ दृष्टीकोन, जिद्द, चिकाटी, हातोटी, सचोटी, आत्मविश्वास मेहनत इत्यादी घटक व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक असून यशवंत होण्यासाठी कृतीवंत होण्याचे आवाहन त्यांनी केले. व्यसनाधिनता त्यातुन व्यसनमुक्त समाज करणे, अज्ञानाच्या व अंधश्रध्देच्या अंधकारातुन विज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणे व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते. मन, मनगट व मस्तक शाबुत ठेवून भरीव व कोरीव कामगिरी करुन सामाजीक बांधीलकी साधण्याचे आवाहन त्यांनी युवकांना केले. यावेळी प्रा. भिमराव उंदरे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा.गायकवाड यांनी केले. संचालन शिंदे याने तर आभार गणेश शिंदे याने मानले.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce, College, Malegaon Dist.Washim

# विद्यार्थ्यांनी कार्यक्षम बनावे - प्राचार्य पवार

*तालुका प्रतिनिधी /३ ऑक्टोबर*

**मालेगाव :** आचार विचारांची सांगड घालुन विद्यार्थ्यांनी कार्यक्षम बनावे असे आवाहन प्राचार्य एम.आर.पवार यांनी करतांना महात्मा गांधीच्या विचाराचे अनुकरण करा असे सांगितले ते महाविद्यालया तर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



स्थानिक रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय येथे रा.से.यो.व्दारा महात्मागांधी शास्त्री यांच्या जयंती दिनानिमित्य कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एम.आर.पवार हे होते. सुरुवातीला महात्मागांधी तथा लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला हारअर्पण करण्यात आले यावेळी मंचावर प्रमुख वक्ते प्रल्हाद पौळकर, प्रा. सुनिल देवळे, प्रा. भरत आव्हाळे, प्रा. सदानंद बनचरे प्रा. भिमराव जांभरुणकर यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. भिमराव जांभरुणकर यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी महात्मा गांधी व शास्त्रीजीच्या जिवनकार्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

कार्यक्रमात बोलतांना प्रल्हाद पौळकर यांनी नाथुराम गोडसे नी महात्मागांधीजीची हत्या केली परंतु गांधीच्या विचार धारेची हत्या कोणी ही करु शकत नाही. त्यांची विचारधारा आजही अजरामअर असुन देशासाठी दिवस्तंभा सारखे अविरीत प्रेरणादायी आहे. असे सांगताना शास्त्रीजीच्या मुत्सदीपणा व कणखर धोरणामुळे १९६५ च्या भारत पाक युध्दात भारताला विजयश्री प्राप्त करुन दिली युवकांनी दोन्ही नेत्यांचे विचार आत्मसात करुन जीवनाचे जडन घडण करण्याचे आवाहन केले. यावेळी अध्यक्षीय भाषनातुन प्राचार्य एम.आर.पवार यांनी युवकांना महामानवांच्या जीवनचरित्र्यातून प्रेरणा घेऊन आचार विचाराची सांगड घालुन कार्यक्रम बनावे असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन शुभम मोहळे याने तर आभार प्रदर्शन शुध्दाधन इंगळे यांने केले. कार्यक्रमाला स्वयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ४/१०/२०१५
दै. देशोन्नती

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim

वाशिम live
देशोन्नती वाशिम, गुरुवार, दि. ८ डिसेंबर २०१६

# डॉ.बाबासाहेबांचे विचार अंगीकृत करावे - प्रा.पवार

तालुका प्रतिनिधी / ७ डिसेंबर

मालेगाव : प्रत्येकात राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली पाहिजे व जातीभेद विसरुन सर्वांनी एकत्र आले पाहीजे. व त्यासाठी आम्ही सर्व भारतीय आहो या अंगीकार करावे, असे विचार रामराव झनक महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार यांनी व्यक्त केले ते मालेगाव येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



रामराव झनक महाविद्यालयाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचा महापरिनिर्वान दिन साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एम.आर. पवार हे होते. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा. भिमराव जांभरुनकर, प्रा. नंदकिशोर गायकवाड हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा करण्यात येऊन अध्यक्षासह उपस्थितांनी त्यांच्या प्रतिमेला हारअर्पण केले. तामिळनाडुच्या मुख्यमंत्री जयललीता यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर शुध्दोधन इंगळे यांच्या भिमस्मृती गित गायणाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी प्रा.नंदकिशोर गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातुन कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. या कार्यक्रमा अंतर्गत शुध्दोधन इंगळे या विद्यार्थ्यांसह अनेकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरच्या जिवनकार्याबाबत आपले विचार मांडले. तर प्रा. भिमराव जांभरुणकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अज्ञान, अंधकार दुर करण्याचे काम केले. भारतीय संविधानचे निर्माण केले. भारताचे आदर्श संविधानही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मोठी देण असल्याचे विचार व्यक्त करतांना या महामानवाच्या कार्याचा आदर्श घ्यावा व विचाराचे अंगीकार करावे, असे सांगितले. तर आपल्या अध्यक्षीय भाषनातून प्राचार्य एम.आर. पवार यांनी घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब यांचे विचार महाण होते. त्यांनी या देशाला संविधान दिले आहे. जातीभेद नष्ट झाला पाहिजेत. सर्व भारतीय एक होऊन अखंड भारत निर्माण करावे, ही त्यांची इच्छा होती. व सर्वात राष्ट्रभावना निर्माण झाली पाहीजे, अशी त्यांची प्रबळ इच्छा होती, असे विचार प्राचार्य पवार यांनी व्यक्त करतांना महामानवाचा आज महा परिनिर्वाण दिन असून त्यांना सर्वांनी अभिवादन केले. कार्यक्रमाचे संचालन कु. काजल मुंढरे हिने केले. तर आभार प्रदर्शन कु. पुजा देशमुख यांने केले. कार्यक्रमाला विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim

तरुण भारत
www.tarunbharat.net

# विद्यार्थ्यांनो सत्कारात्मक दृष्टीकोन ठेवून आपली प्रगती साधा : ॲड. गजेंद्र सरतापे




रासेयो शिबिरात विचार मांडतांना ॲड. सरतापे

**तभा वृत्तसेवा**
**मालेगाव, १७ फेब्रुवारी**

जीवन आनंदाने जगण्यासाठी नकारात्मक विचारापेक्षा सत्कारात्मक विचार करा. आत्मविश्वास बाळगा, वेळेला महत्व द्या, असे आवाहन वाशीम येथील ॲड. गजेंद्र सरतापे यांनी बोलताना केले. ते मालेगाव येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

स्थानिक रामराव झनक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय आत्मसंशोधन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून गुरुदेव आत्म संशोधन केंद्र वाशीमचे अध्यक्ष ॲड. गजेंद्र सरतापे हे होते. या कार्यक्रमाला प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. भीमराव जांभरुणकर यांची उपस्थिती होती. सुरूवातीला संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी केले.

आपल्या प्रमुख मार्गदर्शनपर भाषणात बोलताना ॲड. गजेंद्र सरतापे यांनी माणसाची भावना, विचार सर्वात महत्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांनी व मनुष्याने प्रथम स्वतःला ओळखले पाहिजे. जीवनात नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचाराने जगावे. सकारात्मक विचार ठेवल्यास निश्चित आनंद व समाधान मिळेल, असे सांगतांना त्यांनी पालकांनी आत्मविश्वास असा एकच मित्र असावा. परंतु, तो सुख, दुःखात कमी येणारा असावा. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यगुण साहसीकरण, शिष्टाचार, आत्मपरिक्षणाची दृष्टी, जोश, सकारात्मक विचार या गुणांची गरज असून, तेच विद्यार्थी जीवनात यशस्वी होतील. ज्ञान घेण्यासाठी कोण्या श्रीमंताच्या घरी जन्म घ्यावा लागत नाही, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे संचालन रेणुका नागापुरे हने केले तर आभार प्रदर्शन मंगेश गोटे यांनी केले. कार्यक्रमाला रासेयोचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
...ak Arts & Commerce,
...gaon Dist. Washim

दि. 16 फेब्रुवारी 2017.

जिल्हा २ वाशिम
गुरुवार, दि.१६ फेब्रुवारी २०१७
देशोन्नती

# विद्यार्थ्यांनी नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचार करावा– ॲड. सरतापे

## रामराव झनक महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळा संपन्न






**तालुका प्रतिनिधी** / १५ फेब्रुवारी

**मालेगाव** : जीवन आनंदाने जगण्यासाठी नकारात्मक विचार न करता आत्मविश्वास बाळगा तसेच वेळेलाही महत्व देण्याचे प्रतिपादन वाशिम येथील ॲड. राजेंद्र सरपाते यांनी केले. स्थानिक रामराव झनक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय आत्मसंशोधन कार्यशाळा घेण्यात आली, यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणुन गुरुदेव आत्मसंशोधन केंद्र वाशिमचे अध्यक्ष ॲड.गजेंद्र सरपाते हे होते. या कार्यक्रमाला प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. भिमराव जांभरुनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस संत गाडगेबाबाच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्षाच्याहस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुण्याचे स्वागत महाविद्यालयाच्यावतीने कारण्यात आले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्तविकातून विद्यार्थी हे निर्भिड व्हावे त्यांच्यातील आत्मसन्मान वाढावा व त्यांच्यात डेअरिंग यावी यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगताना त्यांनी आत्मसंशोधन केंद्राचे ॲड. गजेंद्र सरपाते यांच्या कार्याचा परिचय करुन दिला.

आपल्या प्रमुख मार्गदर्शणावर भाषणातून बोलताना ॲड. गजेंद्र सरपाते यांनी माणसाची भावना विचार सर्वात महत्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांनी व मनुष्याने प्रथम स्वःताला ओळखले पाहिजे. आपल्यातील न्युनगंड बाजूला सारले पाहिजे. जीवनात नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचाराने जगावे. सकारात्मक विचार ठेवल्यास निश्चितच आनंद व समाधान मिळतो, असे सांगताना त्यांनी प्रत्येकांनी आत्मविश्वास ठेवावा. जिवनात मित्र चांगला असावा एकच मित्र असावा परंतु तो सुख दुःखात कमी येणारा असावा. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यापुर्ण साहरीकरण शिष्टाचार बॉडी लॅग्वेज, आत्मपरिक्षणाची दुष्टी, जोश, सकारात्मक विचार या गुणाची गरज असून तोच विद्यार्थी जिवनात यशस्वी होईल. ज्ञान घेण्यासाठी कोण्या श्रीमंताच्या घरी जन्मघावा लागत नाही. त्यासाठी स्वःता डेव्हलोप झाला पाहिजे, असेही त्यांनी सांगीतले. आपल्या तब्बल दीड ते दोन तासाच्या मार्गदर्शनावर भाषनातून त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमुल्य मार्गदर्शन केले. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषनातून प्राचार्य मुरलीधर पवार यांनी विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्व विकास घडवावा.

तसेच आत्मसंशोधन करुन आपल्यातील नकारात्मक विचाराला बाजूला सारावे, असे सांगताना त्यांनी ॲड. गजेंद्र सरपाते यांनी अतिशय मोलाचे व महत्वपुर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. त्यामुळे त्यांच्या विचाराला आत्मसात करा, असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन कु. रेणुका नागापुरे हिने तर आभार मंगेश गोटे यांनी केले. कार्यक्रमाला रासेयो विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

PRINCIPAL
rao Zanak Arts & Commerce,
ge,Malegaon Dist.Washim

---

४ दै. देशोन्नती जिल्हा दि. 7/9/2018

# विद्यार्थी प्रगतीमध्ये शिक्षकांची भुमिका महत्वाची -प्रा. पवार




*तालुका प्रतिनिधी* / ६ सप्टेंबर

**मालेगाव** : विद्यार्थी व शिक्षक एकमेकांना पुरक असुन शिक्षकांच्या मार्गदर्शनातच विद्यार्थी घडत असतो. व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीत शिक्षकांची भुमिका ही महत्वाची असते असे विचार रामराव झनक महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार हयांनी व्यक्त केले. ते आयोजीत कार्यक्रमात बोलत होते.

स्थानिक रामराव झनक महाविद्यालयात ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणुन तर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन म्हणुन साजरा करण्यात आला. या निमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. कार्यक्रमाला प्रा. व्ही. व्ही. आरु, प्रॉ. लता जावळे ,प्रा. डॉ. ताजन, प्रा. भिमराव जांभरुनकर यांची प्रमुख उपस्थीती होती.. सर्व प्रथम डॉ.. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. तर यावेळी उपस्थीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. व्ही. व्ही. आरु यांनी आपल्या विचारातुन शिक्षक दिनाचे महत्व सांगितले तर या कार्यक्रमाचे औचीत्य साधून घेण्यात आलेल्या स्वंयशासन कार्यक्रमात स्वंयशासन प्राचार्य आरती भालेराव उपप्राचार्य सविता महाकाळ शिक्षक अजय बनचरे, रुपाली काळे, अर्चना पांडे, वर्षा गोरे, अपेक्षा जैन, मनिषा इंगळे, आश्विनी डहाके, वैशाली घुगे, संकेत वाघ, ओम भोयर, अविनाश ठाकरे, आश्विनी बोरचाटे, पल्लवी गांवडे, ऋषीकेश मुद्राळ, शितल देशमुख, संतोष इत्यादींनी स्वंयशासन मध्ये सक्रीय सहभाग घेऊन शिक्षक म्हणुन भुमिका पार पाडली.

तर कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना प्राचार्य मुरलीधर पवार हयांनी शिक्षक व विद्यार्थी एकमेकांना पुरक असुन दोघांच्या सुंसगतीने विद्यार्थ्यांचा र्सवागीन विकास होतो. चांगले होण्यासाठी जिवनात शिस्तीची तसेच संस्काराची गरज आहे. शिक्षण बरोबर संस्कारीत असणे आवश्यक आहे. चांगले शिक्षक व चांगले संस्कार हा विद्यार्थ्यांला प्रगतीकडे नेतो त्यामुळे विद्यार्थी जिवनात शिक्षकांचा आदर केला जातो. पाहीजे, असे विचार प्राचार्य पवार हयांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन कल्याणी घुगे हिते तर आभार प्रदर्शन रुपाली काळे हिने केले. सुरुवातीस वर्षा गोरे हिने स्वागत गित गायीले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना च्यावतीने करण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थीती होती.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College,Malegaon Dist.Washim

# शैक्षणिक संधीचा फायदा घ्या - प्रा. पवार

## रामराव झनक महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा



*तालुका प्रतिनिधी* / १३ एप्रिल

**मालेगाव :** शैक्षणिक सवलतीचा फायदा घेवून आपली शैक्षणिक प्रगती साधा असे आवाहन करतांना प्राचार्य मुरलीधर पवार यांनी संविधानाचा आदर करा व तशी शपथ प्रत्येकांनी घ्यावी असे सांगितले. ते मालेगाव येथे आयोजीत कार्यक्रमात बोलत होते.

स्थानिक रामराव झनक महाविद्यालयाच्यावतीने ८ ते १४ एप्रिल पर्यंत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयाच्यावतीने शैक्षणिक व सामाजिक दृष्टीकोनातून जनजागृती निमित्त वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्र प्रश्न मंजूषा वादविवाद स्पर्धा आदी कार्यक्रम घेण्यात आले. तर १३ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा.नंदकिशोर गायकवाड, प्रा. सुनिल देव्हडे, प्रा. भिमराव जांभरुणकर, संतोष राजेकर आदीची उपस्थिती होती.

सुरुवातीस प्राचार्य पवार यांच्याहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. तर प्रतिमेची पुजन मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. प्रास्ताविकातून प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताह कार्यक्रम महाविद्यालयात साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत आयोजीत प्रत्येक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला पाहिजे असे सांगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मुरलीधर पवार यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्य घटनेद्वारे देशात समता, स्वातंत्र्य व बंधुता या समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. पिडीत व शोषित असलेल्यांना सामाजिक न्याय, आर्थिक व सामाजिक सरंक्षण इत्यादी संदर्भात शासनाच्या विविध योजनेची माहिती सर्व सामान्य जनतेला व्हावी या उद्देशाने हा सप्ताहा साजरा करण्यात येत असल्याचे सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सवलतीचा फायदा घ्यावा असे सांगितले

तर घटना समितीने संविधान तयार केलेले आहे. त्याचे प्रत्येकाने वाचन केले पाहिजे. त्यानुसार चालले पाहिजे.

राजकीय सामाजीकरणामुळे आरक्षणानुसार प्रत्येक पदापर्यंत महिलांना स्थान मिळाले. असे सांगताना घटनेचा आदर करा शैक्षणिक संधीचा फायदा घ्या असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन प्रिती काबळे हिने तर आभार प्रदर्शन कु. आश्विनी सोनुने हिने केले. या सप्ताह अंतर्गत महाविद्यालयाच्या वतीने वकृत्व स्पर्धा, चर्चासत्रसह इतर स्पर्धा घेण्यात

ePaper देशोन्नती Sat, 14 April 2018
deshonnati.digitaledition.in//c/27908623

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist.Washim

---

दै. देशोन्नती 21/02/19

# शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करा- प्रा.गायकवाड



*तालुका प्रतिनिधी* /२० फेब्रुवारी

**मालेगाव :** शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी विचार आत्मसात करुन विद्यार्थ्यांनी विचारक्रांती व समाजक्रांती घडवून शैक्षणिक क्रांतीच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन प्राचार्य. भगवानराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना केले.

स्थानिक रामराव झनक महाविद्यालय मालेगाव येथे रासेयोद्वारा आयोजीत शिवजयंती कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते. विचारपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य मुरलीधर पवार, प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेहकर येथील बी.एड. कॉलेचे माजी प्राचार्य भगवानराव गायकवाड विचारमंच्यावर विराजमान होते. तसेच भगवानराव खराटे, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते रासेयो कार्यक्रमा अधिकारी प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. भिमराव जांभरुणकर, प्रा. योगेश्वर निकस, विचारपीठावर विराजमान होते. प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य भगवानराव गायकवाड, पुढे म्हणाले की, शिवाजी महाराज यांचे पर्यावरणाविषयक प्रदुषणमुक्त विचार, प्राणीमात्रावर दया, स्त्रिचा आदर, संघटन कौशल्य, इत्यादी गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करुन समाज प्रबोधन करण्याचे आवाहन त्यांनी रासेयो स्वयंसेवकांना केले. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार म्हणाल की, शिवजयंती कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी नवचैतन्य निर्माण करुन मरगळ झटकून शिवाजी महाराजांच्या विचारांची कास धरुन आपला व्यक्तीमहत्व विकास घडवून समाजप्रबोधनाचा विडा उचलण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गायकवाड, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी केले. संचालन अजय बनचरे याने तर आभार कु. लक्ष्मी देवळे हीने मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist.Washim

दै. भास्कर दि. 13-01-2019

# मां जिजाऊ व स्वामी विवेकानंद के विचार आत्मसात करें : प्राचार्य पवार



तहसील संवाददाता | मालेगांव

मां जिजाऊ व स्वामी विवेकानंद के विचार व आदर्श विद्यार्थियों द्वारा आत्मसात कर अभ्यासू व सुसंस्कारित बनना समय की जरुरत होने का प्रतिपादन प्राचार्य मुरलीधर पवार ने किया । रासेयो द्वारा आयोजित स्थानीय रामराव झनक महाविद्यालय में मां जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम की अध्यक्षता करते हुए प्राचार्य पवार सम्बोधित कर रहे थे । प्रारंभ में गणमान्यजनों द्वारा मां जिजाऊ व स्वामी विवेकानंद की प्रतिमा का पूजन कर माल्यार्पण किया गया । अपने सम्बोधन में प्राचार्य पवार ने आगे कहा कि मां जिजाऊ की भव्यदिव्य दृष्टि से शिवाजी महाराज ने स्वराज्य की बुनियाद रखी और महिलाओं को सम्मान का दर्जा दिया । इसी प्रकार वर्तमान के प्रगतिशील विद्यार्थियों को स्वामी विवेकानंद के विचारों की सख्त जरुरत होने की बात भी उन्होंने कही । प्रमुख मार्गदर्शिका डा. सीमा चव्हाण व प्रा. डा. लता जावले ने भी राष्ट्रमाता मां जिजाऊ व स्वामी विवेकानंद के जीवनकार्य पर गहन प्रकाश डाला । मां जिजाऊ की भूमिका व वेश में पुजा गव्हांदे विचारमंच पर उपस्थित थे । ओम भोयर ने जिजाऊ वंदना कही । रुपाली काले, ज्ञानेश्वर देशमुख, नागेश कोल्हाल, कोमल अंभोरे ने अपने विचार व्यक्त किए । प्रस्ताविक प्रा. भिमराव जांभरुणकर ने तो संचालन कल्याणी घुगे ने किया । अंत में आभारमाना रुपाली काले ने । कार्यक्रम में प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी बड़ी तादाद में उपस्थित थे ।

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim

दै. देशोन्नती दि. २१ ऑगस्ट २०१९

# Classified

# कार्यशाळा व युवा माहिती दूत कार्यक्रम



*तालुका प्रतिनिधी/२० ऑगस्ट*

**मालेगाव :** स्थानिक रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव येथे रासेयो मास्टरमाईड संगणक व माहिती व जनसंपर्क महासंचनालय युनिसेफ उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण संचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने संगणक साक्षरता व सायबर सुरक्षितता व युवा माहिती दूत यासंबंधी एकदिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुरलीधर पवार, प्रमुख मार्गदर्शक म्हणून किरण जिरवणकर, ज्ञानेश्वर घोळवे व प्रा. नंदकिशोर गायकवाड, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. भिमराव जांभरुणकर, विचार पिठावर विराजमान होते. युवा माहिती दूतासंबंधी माहिती देताना अनुलोम भाग जनसेवक रिसोड, मालेगांव, ज्ञानेश्वर घोळवे यांनी रासेयो स्वयंसेवकांना आवाहन केले की युवा माहिती दूत हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला असून त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी युवा माहिती दूत ॲप डाऊनलोड करावे व वंचित घटकांना शासकीय योजनेचा लाभ मिळून द्यावा. त्यानंतर मास्टरमाईंड संस्थेचे संचालक किरण जिरवणकर यांनी सामवर सुरक्षितता व संगणक साक्षरतता या विषयावर प्रोजेक्टर व्दारा सविस्तर प्रकाश टाकला. ते पुढे म्हणाले की, आजकाल सायबर गुन्हेगारी वाढली असून त्यासंदर्भात सर्वांनी सावधानता व सकर्तता बाळगुन स्वतःची फसवणुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मोबाईलचा उपयोग हा कमीत कमी फक्त २० मिनिटं चांगल्या शैक्षणिक कामासाठी करावा असे सांगितले. सायबर क्राईमसंबंधी सुरक्षितेसाठी विद्यार्थ्यांनी जनजागृती करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मुरलीधर पवार यांनी सायबर सुरक्षितता बाळगणे महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेतून बोध घ्यावा असे आवाहन केले. तसेच युवा माहिती दूत बनून जनसामान्यांना योजनांचा लाभ मिळून द्यावा असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमात अधिकारी प्रा. भिमराव जांभरुणकर यांनी केले. आभार प्रदर्शन गणेश खडसे यांनी मानले.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim

दै. देशोन्नती दि. 12 सप्टेंबर 2019

वाशिम जिल्हा (रिसोड, मालेगाव, मंगरुळपीर, कारंजा, मानोरा)

# सायबर क्राईम संबंधी सर्तकता बाळगा - उपनिरीक्षक सारीका राऊत



*तालुका प्रतिनिधी* /११ सप्टेंबर

**मालेगाव :** शिवशक्ती गणेश मंडळ मालेगाव व रासेयोच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव येथे सायबर क्राईम संबंधी बोलताना मालेगाव पोसि स्टेशनच्या उपनिरीक्षक सारीका राऊत म्हणाल्या की सोशल मिडीयाचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यी व इतरांनी सायबर क्राईमसंबंधी सतर्कता व सावधानता बाळगणे आवश्यक आहे. सोशल मिडिया जसे व्हॉटसॲप, फेसबुक, मेसेजर इत्यादीचा सदुपयोग करावा व विधायक कामासाठी त्यांच्या वापर करावा अन्यथा दुरुपयोग केल्यास सायबर गुन्हे दाखल होऊ शकतात. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार, प्रमुख पाहुणे, ए.पी.आय सारीका राऊत, हेड कॉन्स्टेबल संजय पिंपरकर, गजानन काळे, डोईफोडे , मोहन वानखेडे, घुगे, प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. डॉ. भिमराव जांभरुणकर, प्रकाशजी भूरे, बांधकाम सभापती गजानन सारस्कर, विचारमंचावर विराजमान होते. हेड कॉन्स्टेबल गजानन काळे यांनी सोशल मिडिया व सायबर क्राईम व इतर गुन्हाबाबत विद्यार्थ्यांना व उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सोशल मिडियाचे फायदे तोट्यांवर यथार्त प्रकाश टाकला. गणेश मंडळ शिवशक्तीचे अध्यक्ष मालेगाव मोहन वानखेडे यांनी गणेशत्सावा दरम्यान राबविण्यात येणाऱ्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाची रुपरेषा मांडली अध्यक्षस्थानाहुन बोलताना प्राचार्य मुरलीधर पवार म्हणाले की, सोशल मिडियामुळे शैक्षणिक व सामाजिक क्रांती झाली आहे. त्यामुळे क्षणार्धात विश्वात काम सुरु आहे. त्याचे ज्ञान होते. परंतु सायबर क्राईम होणार नाहीत याची दक्षता बाळगुन चांगल्या कार्यासाठी त्याचा उपयोग करावा. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भिमराव जांभरुणकर यांनी केले. कार्यक्रमाला भरमच्च विद्यार्थी प्राध्यापक,प्राध्यापकेत्तर, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवशक्ती गणेश मंडळाने अथक परिश्रम घेतले.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College,Malegaon Dist.Washim

# यशस्वी होण्यासाठी सतत कर्तव्याची जाणीव ठेवा - प्रा. पवार



**तालुका प्रतिनिधी** /५ मार्च

**मालेगाव** : भावी जिवन उज्वल व यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी सतत कर्तव्य व जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवण्याचे आवाहन प्राचार्य मुरलीधर पवार यांनी विद्यार्थ्यांना केले.

रामराव झनक व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव येथे बी.ए भाग तीन व बी कॉम भाग तीन च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभात अध्यक्षीय स्थानावून बोलत होते.ते पुढे म्हणाले की, जीद्द चिकाटी, प्रयत्न व मेहनत अभ्यासुवृत्ती जिवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याने कर्तव्य तंतोतन पालन करणे, व्यक्ती विकासासाठी आवश्यक आहे. जिवनात चांगल्या गुंणानी उर्तीर्ण होण्यासाठी अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यानी अभ्यासाची कास धरुन आपले जिवन यशस्वी व उज्वल बनवावे म्हणुन सर्वांना या निरोप समारंभाच्या निमित्ताने मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पल्लवी गावंडे, तर आभार शुभांगी कांबळे हिने मानले.कार्यक्रमाला प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. डॉ. संजय ताजणे, प्रा. भिमराव जांभरुणकर, प्रा. दिपक जमधाडे, प्रा. वाय.एस निकस, गणेश खडसे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim

दै. देशोन्नती दि १ मार्च 2020 (पान नं. ४)

विविध ठिकाणी मराठी भाषा दिन साजरा !

## वाचन, लेखन, चिंतन विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज - प्रा. आव्हाळे



मालेगाव (ता.प्र.) : स्वतःचा उत्कर्ष करण्यासाठी विद्यार्थ्यांना वाचन, लेखन, चिंतन व मंथन करणे ही काळाजी गरज असल्याचे प्रतिपादन प्रा.भरत आव्हाळे यांनी केले. ते रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय येथे रासेयो व मराठी विभागाच्यावतीने आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाहून बोलत होते.

प्रा. मुरलीधर पवार यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.भरत आव्हाळे, प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.बाळासाहेब वाघ, प्रा. योगेश्वर निकस, प्रमुख उपस्थिती प्रा. सुनिल देव्हडे तथा आयोजक प्रा.डॉ.लता जावळे, प्रा.डॉ. भिमराव जांभरुणकर विचारपिठावर विराजमान होते. वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जयंतीदिन हा मराठी भाषदिन म्हणून विविध कार्यक्रम व स्पर्धा घेवून मोठ्या थाटामात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात ग्रंथ हेच गुरु या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये कोमल इंगळे, आरती कांबळे, वैष्णवी इंगळे, ज्ञानेश्वर देशमुख, प्रीती घुगे, शुभम सरकटे, नागसेन सरकटे, संघदिप गुडदे, आरती शिंदे, सोनाली खिल्लारे, प्रिया देव्हळे यांनी भाग घेतला त्यामध्ये ज्ञानेश्वर देशमुख प्रथम, वैष्णवी इंगळे व्दितीय व आरती कांबळे तृतीय क्रमांक पटकावला या स्पर्धेचे परीक्षक म्हणुन प्रा.डॉ.बाळासाहेब वाघ व प्रा.योगेश्वर निकस यांनी काम पाहिले. प्रा. योगेश्वर निकस म्हणाले पुस्तकांचे व वर्तमानपत्राचे वाचन करुन स्पर्धा परिक्षेला सामोरे जावून यशवंत व्हावे, प्रा.डॉ.बाळासाहेब वाघ म्हणाले की, पुस्तकवाचन हे मेंदूचे खाद्य असून वाचनाने लख्ख प्रकाश पडून बुध्दी तल्लख बनते. प्रा.सुनिल देव्हडे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा.डॉ. लता जावळे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा मांडली कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. भिमराव जांभरुणकर यांनी केले.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College,Malegaon Dist.Washim